
ISSN: 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF)
Volume - 8 | Issue - 9 | June - 2019
REVIEW OF RESEARCH
International Online Multidisciplinary Journal
UGC APPROVED Journal No.: 48514

# भारतीय राज्यकर्ते व घोडयांची आयात



डॉ. राम फाटक

डॉ. राम फाटक
कला व विज्ञान महाविदयालय पाटोदा जि.बीड, (महाराष्ट्र)

प्रस्तावना : आपल्या भारत देशाला अश्वरोहणाचा प्रदीर्घ असा इतिहास आहे. प्राचीन काळामध्ये भारतीय उपखंडाची व्याप्ती ब-याच दूरवर पसरलेली होती......................

Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi

Scanned with CamScanner

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# भारतीय राज्यकर्ते व घोडयांची आयात

डॉ. राम फाटक
कला व विज्ञान महाविदयालय पाटोदा जि.बीड. (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**



आपल्या भारत देशाला अश्वरोहणाचा प्रदीर्घ असा इतिहास आहे. प्राचीन काळामध्ये भारतीय उपखंडाची व्याप्ती ब–याच दूरवर पसरलेली होती. आजही त्या त्या प्रदेशातील घोडयांच्या स्थानिक प्रजाती या भारतीय अश्व म्हणूनच ओळखल्या जातात. उदाहरणच दयायचे झाले तर सिंधी घोडा हे घोडे आजही मुळ भारतीय घोडे म्हणूनच ओळखले जातात. भारतीय अश्वांच्या या शिवायही कांही प्रमुख प्रजाती आहेत. त्यामध्ये मारवाडी घोडा, भिमथडी तट्टू, सिंधी घोडा, पहाडी तट्टू त्याचप्रमाणे भारतीय सेना प्रजाती ही ब्रिटीश काळापासून वेगळेपण जपलेली अशी एक संमिश्र अश्वप्रजाती असून या जातीचे घोडे हे भारतीय सेना वगळता जगात कोठेही आढळत नाहीत. आशाप्रकारचे उल्लेख संदर्भ ग्रंथामध्ये आढळतात.

मानवाने घोडयांना माणसाळून त्यांचा वाहन म्हणून प्राचीन काळापासून उपयोग केला आहे. जगामध्ये भारतातल्या प्रमाणेच घोडयांच्या अनेक प्रजाती आढळून येतात. मंगोलिया सारखे कांही देश तर केवळ त्या ठिकाणच्या अश्वसंस्कृतीबाबत प्रसिध्द आहेत. जगाच्या विविध भागामध्ये घोडयांच्या अनेक प्रजाती आढळून येतात. जगाच्या विविध भागामध्ये आढळणा–या घोडयांच्या प्रमुख प्रजाती आपणास साधनग्रंथाच्या आधारे याप्रमाणे सांगता येतील, “अरबी घोडा, ध्रुवीय घोडा, स्कॅडिनेव्हीयन घोडा, भारतीय घोडा, इंग्रजी घोडा, अमेरिकन, घोडा, मंगोलियन घोडा, ऑस्टेलियन घोडा”[1] या प्रमुख प्रजाती झाल्या अनेक प्रदेशामध्ये स्थानिक – स्थानिक प्रजाती सुध्दा अभ्यासकांच्या लक्षात आलेल्या आहेत. उदा. महाराष्ट्रातील भीमथडी आणि निरथडी घोडे, अशाच प्रकारे जगामध्ये घोडयांच्या अनेक स्थानिक प्रजाती आढळून येतात.

भारतीय राज्यकर्त्यांना इराणी आणि अरबी घोडयांचे आकर्षण होते. कारण त्यांना युध्दासाठी लागणा–या घोडयांची परदेशातून आयात करावी लागे, अगदी प्राचीन कालखंडातील राज्यकर्त्यापासून परकीय व्यापारी हिंदूस्थानला घोडे पुरतीत होते. पोर्तुगीज दर्यावर्दी‘बर्थोलोम्यु’ हा पंधराव्या शतकामध्ये भारतात आला. त्यावेळी दक्षिण भारतामध्ये विजयनगरचे सांम्राज्य होते. पोर्तूगीत व्यापारी विजयनगरला घोडयांची निर्यात करत असा त्याने उल्लेख केला आहे. तत्कालीन कागदपत्रामध्ये त्याचा पुरावा मिळतो. “1486 पासून पुढोल सत्तर वर्षापर्यंत पोर्तुगीजांचा भर हिंदुस्थानावर होता. त्यावेळी दक्षिणेत विजयनगर सांभ्राज्य फार भरभराटीत असून पोर्तुगीजांचे त्याचबरोबर बरेच दळण–वळण होते. ते घोडे ताप्ता, सटीण, चिनी रेशीम, पोतळी इत्यादी जिन्नस विजयनगरास विकीस नेउन तेथून तलम कापड खरेदी करुन युरोपमध्ये पाठवीत.”[2] पोर्तुगाल व्यापा–या प्रमाणेच इराण अरबस्तानातील मुस्लीम व्यापारी हिंदूस्थानला घोडे पुरविण्याचा धंदा करत होते. भारतीय राज्यकर्त्यांनी



Scanned with CamScanner

प्रामुखाने या मुस्लीम व्यापारी लोकांकडून घोडयांची खरेदी केल्याचे आपणास दिसून येते. दक्षिणेत असणा–या मराठी सत्तेतील कुडाळ प्रांतचा अधिकारी एक डच घोडा मिळवण्याच्या हेतूने व्यापा–यास विनंती करत असल्याची एक नोंद ऑगस्ट 1664 च्या डागरजिस्टरमध्ये पाहायला मिळते. ती नोंद असी आहे की, "सरसुभेदार रावजी सोमनाथ पंडीत याने'सौत व्हिलिएट' नावाच्या व्यापा–याला अनेक वेळा आग्रहाने आपल्या भेटीस बोलावल्यामुळे तो नोव्हेंबर 22 तारखेला कुडाळला जावून त्याला भेटला. राजापुरला सुमुहूर्तावर सोतने येउन राहावे असा आग्रह धरुन त्याबद्दल त्याने बटेव्हियाच्या मंडळाणाही लिहून कळवावे, असे त्याच्याकडून रावजी पंडीताने कबुल करुन घेतले. शिवाजी करीता एक डच घोडा मिळवावा ह्याही त्याच्या मागणीला कोणत्याही त–हेने आडपडदा न ठेवतां मार्गातील वाहतुकीच्या वगैरे अनेक प्रकारच्या अडचणी सांगीतल्यावर त्याची तब्येत गेली."[3]

मराठयांच्या सत्तेतील अधिकारी परकीय व्यापा–यांवर मैत्रीपूर्ण संबंध ठेवत असायचे कारण त्यांना लागणा–या परकीय घोडयांची गरज या व्यापा–याकडून भागणार होती. खुद छत्रपती संभाजी महाराज यांनी देखील अरब व्यापा–यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले होते. हे गोव्याच्या व्हॉइसरॉयला आवडले नाही. म्हणून त्याने संभाजी राजेंना पत्र पाठवून आपली नापसंती व्यक्त केली आहे. व्हॉइसरॉयने या बाबत तकार केली आहे की, "आरबाजवळ जी आपण मैत्री केली आहेत. त्याबददल आमची तकार तुमचे वकील येसाजी गंभीरराव याजकडे दिली आहे. आरब म्हणजे आमचे शत्रू आहेत. त्यांना तुम्ही आपल्या चाकरीत घेत आहात, त्यांना तुमच्या मुलखात वखारीही उघडण्यास बोलावीत आहात आणि त्यांनी आमच्या शहरवासीय व्यापा–यास तुटून जडजवाहिर घेतले ते आपण ठेवून घेत आहात असे असूनही आपण आम्हास कळविता की, आमची अरबांविषयी माहिती चुकीची आहे. आणि ते फक्त तुमचे बंदरात घोडे विकीस आले होते. परंतु आमचेकडे जी माहिती आली आहे ती आपल्या लिहिण्याच्या अगदी विरुध्द आहे."[4]

या प्रमाणे पोर्तुगीज व्हॉइसरॉयने तकार करुनही पोर्तुगालचे व आपले राजनैतिक संबंध बिघडतील याची फिकीर संभाजी राजेंनी केलेली नाही. व्हॉइसरॉयच्या या तकारीनंतरही घोडयांच्या अरब व्यापा–यांना त्यांनी आश्रय दिलेला आहे. कारण त्यांच्या काळात मराठा मोगल युध्द अखंड सुरु होते. युध्दात सतत घोडे कामी येत असल्यामुळे घोडयांची मोठी टंचाई नेहमीच निर्माण होत होती. ती भरुन काढने निकडीचे होते. कारण मराठा मोगल संघर्ष थांबण्याची सतुराम शक्यता नव्हती, त्याकाळी प्रचंड फौज घेउन खुद्द औरंगजेब बादशहा दक्षिणेतील मराठी सत्ता नामशेष करण्याच्या हेतूने महाराष्ट्रात धुमाकुल घालत होता. त्याला पायबंद घातण्यासाठी मोगलांच्या तोडीस – तोड घोडदळ उभारणे संभाजी महाराजांना गरजेचे होते आणि त्यासाठी मराठी सत्ताधीशांना व मराठयांप्रमाणेच दक्षिणेत असणा–या इतर मुस्लीम शासकांनाही मोगल टोळधाडीपासून स्वसंरक्षण करण्यासाठी घोडदल उभारणे आवश्यक होते. परिणामतः घोडयांची सतत खरेदी करुन नवीन घोडदळ उभारणे भाग होते. या अनुषंगाने आणखी एका ठिकाणी असा उल्लेख सापडतो की, "पोर्तुगाल व अरब यांच्या वैमनस्याचा फायदा घेउन संभाजीराजांनी अरबांशी मैत्री संपादली व त्यायोगे घोडयांची खरेदी–विकी संभाजीराजांच्या मुलूखात होवू लागली व आरबी आरमाराचा पाठिंबा मिळाल्याने संभाजीराजांचे आरमार अधिक प्रबळझाले."[5]

घोडयांच्या आयाती संबंधी इ.स.1688 चे एक पत्र साधन ग्रंथामध्ये मिळाले त्या पत्रामध्ये घोडयांच्या वाहतुकीतील अडचणीसंबंधी उल्लेख आलेला आहे. त्या पत्रामध्ये उल्लेख असा आहे की, "येख्तयारखान सौदागर, मजकुरी राहात आहे. त्याने घोडीयाचे खरेदीबददल मस्कत बंदरास गेला होता. घोडे खरेदी करुन राजापूर बंदरास आले, तेथे दिवाण लोकी अगदी जहाजपैकी 9 घोडे कैद केले. त्यामध्ये आमचे स्वारास घोडे आणावयास सांगितले होते. तरी स्वामीने रा. बाबा स्वामीस विनंती करुन सदरहू घोडी येत सारखे केले पाहिजे. म्हणून हणमंतराउ हेजीब लक्ष्मेश्वरकर याने बाबा स्वामीस विनंती केली जे हे सौदागर आमचे राजमानाचा बहुत स्नेहीत. सदरहू घोडीयाचे बहुत आगत्या म्हणून बहुत प्रकारे विनंती करुन होतां कृपाळू होवून 9 घोडीयाचा निर्वाह लक्ष्मेश्वराकडे करुन दिधला आहे."[6]

वरील पत्रामध्ये राजापूर बंदराचा उल्लेख आलेला आहे. मस्कतहून येणारी व्यापारी घोडी या बंदरामध्ये उतरुन घेण्यात येत असत हे या पत्रावरुन लक्षात येते. याप्रमाणेच 25 जून 1694 च्या मोगल बातमीपत्रामध्ये घोडयांच्या परकीय व्यापा–यांचा उल्लेख आलेला असून तो याप्रमाणे, "सुभानगडचा किल्लेदार व फौजदार सययद लतीफ याने अब्दुलगनी या घोडयाच्या सौदागराकडून राहदारीच्या निमित्ताने एक घोडा घेतला."[7]



Scanned with CamScanner

VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

महंमद फाजल कदीम शरीफ यांच्या 25 मार्च 1695 च्या फार्सी हुकुमाचे भाषांतर खाली दिले आहे. त्यामध्ये घोडयांच्या व्यापा–यांचा उल्लेख येतो तो अशाप्रकारे, "तारीख 4 माहे रजब रोजी बादशाही हुकुम झाला की, दक्षिण प्रांताच्या मोठया रस्त्यावर व नद्यांच्या उतारावर जसा पाहिजे तसा बंदोबस्त राहात नाही. घोडयांचे सौदागर व हत्यारांचे व्यापारी युध्दोपयोगी शस्त्रास्त्रासंबंधी हर प्रयत्न सुभेदार व इतर सरदार व सरकारी अधिकारी अथवा पंतप्रधानाच्या मोहोरच्या परवान्याशिवाय घेवून जातात. हुकुम लिहिला की, कोणत्याही शिपायांनी अथवा घोडयांच्या सवदागिरांनी अथवा हत्याराच्या व्यापा–यांनी बिगरपरवाना युध्दोपयोगी शस्त्रे घेवू नयेत."[8]

इ.स. 3 ऑगस्ट 1701 या रोजीच्या मोगल बातमीपत्रामध्ये काबुलहून आयात केलेल्या घोडयांची नोंद मिळते त्यामध्ये आलेला उल्लेख असा आहे की, "काबुलहून पाचशे घोडे पाठविण्यात आले असून ते औरंगाबादपर्यंत आले आहेत असे बादशहांना कळवण्यात आले. एका गुर्जबर्दाराने जावून घोडे हुजुरात आणावे अशी आज्ञा झाली."[9]

वरील बातमी पत्रातील उल्लेखाप्रमाणे घोडयांना परदेशातून आयाती संबंधीचे उल्लेख असंख्य ठिकाणी आढळतात भारतीय राज्यकर्त्यांना परदेशातून घोडे आयात करण्यावाचून दुसरा पर्याय नव्हता. मध्ययुगामध्ये मोगल सत्ताधीशांना संपूर्ण भारत स्वतःच्या वर्चस्वाखाली आणण्यासाठीचे प्रयत्न अखंड सुरु होते. म्हणून सततची युध्दे आणि युध्द प्रसंग ही अपरिहार्य बाब बनली. भारतासारखा खंडप्राय देश ताब्यात घेण्यासाठी वेगवान सैन्य व सैन्य हालचालीसाठी चपळ घोडदाळाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. म्हणून मोगलांनी घोडदळावर अधिक भर दिला. प्रत्येक शासकाने घोडयांच्या खरेदीकडे जातीने लक्ष दिले. उत्तम प्रतीचे घोडे भारतात पैदा होत नसल्यामुळे कायमच परदेशी घोडयांच्या खरेदीवर अवलंबून राहावे लागले. सुरत बंदरामध्ये मोठया प्रमाणात घोडयांची आयात होत असे. मोगलांचा सुरतेच्या बंदराचा अधिकारी याने नजराणा म्हणून बादशहास कांही घोडे पाठवल्याबाबतची एक नोंद 12 मार्च 1703 च्या बातमीपत्रामध्ये आलेली आहे.सुरत बंदराच्या मुत्सदी एतिबारखान याने बादशहाकडे पेशकश म्हणून पाठविण्यासाठी आरबी घोडे आणि इतर वस्तू जमविल्या आणि याकुतखानामार्फत त्याने त्या बादशहाकडे पाठविल्या. "बादशहानी त्या वस्तू आपल्या समोर आणाव्यात अशी आज्ञा केली."[10]

घोडयांच्या बाबतीत हिंदुस्थानी शासनकर्त्यांचे हे परावलंबित्व परकीय प्रवाशांच्याही नजरेतून सुटले नाही. तशा नोंदी परकीय प्रवाशांच्या प्रवास वृत्तामध्ये सापडतात. डॉ.मनुची हा इटालीयन प्रवासी आपल्या प्रवास वर्णनामध्ये नोंद करतो की, मोगल सैन्यात वापरले जाणारे घोडे हे बल्क, बुखारा आणि काबुल येथून आणते जातात. त्या भांगातून दरवर्षी एक लाखाहून अधिक घोडे आयात केले जातात. त्यांच्यावरील करामुळे बादशहास बरेच उत्पन्न मिळते. सिंधु नदी ओलांडून हिंदूस्थानात येतांना घोडयांच्या किंमतीवर शेकडा 25 जकात घेतली जाते. उत्तमोत्तम घोडे बादशहाच्या तैनातीसाठी ठेवले जातात. साधारणपणे 12 हजार घोडे निवडून घेण्यात येतात. बल्क, बुखारा या भागातून दरवर्षी अनेक उंटावर लादलेली खरबुजे,टरबुजे, नासपाती, बेदाणा, डाळिंबे, किसमीस आणि इतर सुकामेवा यांची हिंदुस्थानात आयात होत असते. या भागातून येणा–या घोडयांना तुर्की म्हणतात हे घोडे चपळ, काटक, निर्भय आणि इमानी असतात."[11]

चौल हे अलिबाग तालुक्यातील एक गांव, मध्ययुगामध्ये एक व्यापारी बंदर व उदयोगाचे केंद्र म्हणून प्रसिध्दीस पावले होते. 1670 नंतर हे ठिकाण मराठा छत्रपती शिवाजी महारांच्या ताब्यात आले, परकीय प्रवासी डॉ. फायर याने चोलला 1672 नंतर भेट दिली. तेथील व्यापाराच्या बाबतीत त्याने उल्लेख केला आहे की,"चौलला रेशमाचा धंदा मोठा होता, घोडयांचा व्यापार या बंदरातून होत असे."[12]

मध्यकालीन भारताचा प्रवास करणा–या प्रवाशामध्ये, फायर आणि मनुची हे प्रख्यात असे प्रवासी आहेत. त्यांनी आपल्या प्रवासा दरम्यान जे पाहिले त्याच्या बारकाव्याने नोंदी ठेवल्या, फायर प्रमाणेच मनुची आणखी एका ठिकाणी लिहितो, सप्त सिंधू ही देशाच्या आतील भागात वाहणा–या सात नदयांचा संगम होवून बनली आहे. आम्हाला तेथे बरीच अरबी व इराणी जहाजे दिसली, खजूर, घोडे, बीड, मोती,राळ, सोनामुखी हा माल या जहाजांतून आयात करत हा माल मक्केहून आलेला असायचा."[13]



Scanned with CamScanner

सारांश :

वरील प्रमाणे मध्यकालीन भारतीय शासकांनी परकीय घोडे आयात केल्याबाबतचे संदर्भ तत्कालीन कागदपत्रामध्ये पहावयास मिळतात, त्याचप्रमाणे परकीय प्रवाशांच्या प्रवास वर्णनातही या संबंधी उल्लेख आलेले आहेत. एवढी ही बाब सार्वजनिक होती. कारण मध्ययुगीन भारताचा इतिहास हा मुस्लीम आक्रमकांच्या टोळधाडींनी व्यापलेला आहे. हिंदुस्थावर मुस्लीमांची जी आक्रमणे झाली त्यावेळी त्यांच्या सैन्यामध्ये प्रामुख्याने घोडदळाचा भरणा अधिक असायचा या आक्रमकांबरोबर त्यांना वेळोवेळी पराभव पत्कारावा लागला व उत्तर हिंदुस्थानची सत्ता मुस्लीमांच्या हाती गेली. यानंतर उत्तर हिंदुस्थानातील मुस्लीम शासकांनी संपूर्ण हिंदुस्थान स्वतःच्या वर्चस्वाखाली आणण्यासाठी अखंड संघर्ष कित्येक शतके चालू ठेवला.

स्थानिक भारतीय राज्यकर्त्याबरोबर मुस्लीम शासकांची जी युध्दे घडून आली त्या प्रत्येक झटापटीत त्यांनी प्रामुख्याने घोडदळाचा वापर अधिक केला. मुस्लीम आक्रमकांकडून सततचे होणारे पराभव टाळण्यासाठी भारतीय शासकांनाही जुनी सैन्य व्यवस्था बदलून सैन्यात घोडदळाचा अधिक वापर करणे आवश्यक बनले. परिणामतः सैन्यामध्ये घोडयांनी संख्या वाढली. मध्ययुगीन भारतीय सैन्यसंघटनामध्ये घोडदळास जे प्रमुख स्थान मिळाले ते यामुळे साहजिकच स्थानिक घोडे सैन्यासाठी कमी पडू लागले आणि ही गरज भारतीय राज्यकर्त्यांना परकीय घोडे आयात करुन भागवावी लागली. मोगल आक्रमणास तोंड देण्यासाठी मराठी राज्यकर्त्यांनाही आपले घोडदळ मोगलांच्या तोडीस तोड उभारणे गरजेचे बनले. त्यासाठी घोडयांची आयात करणे क्रमप्राप्त होते. साधारणतः राजापूर, चौल, सुरत या बंदरातून घोडयांची आयात होत असे.

संदर्भ :


1. https://mr.wikipedia.org
2. वा.कृ.भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, नवी दिल्ली, 1976, पृ.247.
3. सं.श.ना.जोशी,शिवकालीन पत्रसार संग्रह,खंड–3, पुणे,1930, पृ.263–64.
4. वा.सी.बेंद्रे,श्री छत्रपती शिवाजी महाराज,मुंबई, 1971, पृ.288–29.
5. उपरोक्त, पृ.278.
6. सं.श.ना.जोशी,संभाजीकालीन पत्रसार संग्रह, पुणे,शके 1871,पृ.85–86.
7. सं.से.श्री.पगडी, मोगल दरबारची बातमीपत्रे,खं.2,मुंबई,1978,पृ.45.
8. बा.सी.बेंद्रे,श्री छत्रपती राजाराम महाराज,मुंबई,1975, पृ.213.
9. सं.से.श्री.पगडी, मोगल दरबारची बातमीपत्रे,खं.3, मुंबई,1983,पृ.144.
10. उपरोक्त,पृ.43.
11. अनु.ज.स.चौबळ,असे होते मोगल, मुंबई, 1982,पृ.320–21.
12. अ.रा.कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्,पुणे,1993,पृ.85.
13. अनु.ज.स.चौबळ,असे होते मोगल, मुंबई, 1982,पृ.2.




Scanned with CamScanner